महाराष्ट्र विकास सेवा गट-अ मधील अधिकाऱ्यांच्या पदस्थापना.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन आदेश क्रमांक : मविसे-१०१७/प्र.क्र.२७०/२०१७/आस्था-३,

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, मुंबई - ४०० ००१.
तारीख : २३ मे, २०१८.

शासन आदेश :-

समक्रमांकाच्या दिनांक ३ मे, २०१८ च्या शासन आदेशातील अनुक्रमांक ७ येथील श्री.ए.पी.पिंगळे, गट विकास अधिकारी,पंचायत समिती मालेगाव, जिल्हा नाशिक यांचे बदलीचे आदेश याद्वारे रद्द करण्यात येत आहेत. परिणामी श्री.ए.पी.पिंगळे हे गट विकास अधिकारी, पंचायत समिती मालेगाव, जिल्हा नाशिक या पदावर कार्यरत राहतील. तसेच सदर आदेशातील श्री.एस.ए.राऊत व श्री.एम.के.वाघ यांच्या सुधारीत पदस्थापनेचे आदेश खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे. सदर बदल्या सार्वजनिक सेवेच्या हितार्थ महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने आणि उक्त अधिनियमाच्या कलम ४(४) व ४(५) मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्वमान्यतेने करण्यात येत आहे :-

अ. क्र.	अधिकाऱ्याचे नाव, सध्या धारण केलेले पद व ठिकाण	बदलीने पदस्थापनेचे पद व ठिकाण	शेरा
(१)	(२)	(३)	(४)
१.	श्री.एस.ए.राऊत गट विकास अधिकारी, पंचायत समिती उदगीर, जिल्हा लातूर.	गट विकास अधिकारी, पंचायत समिती सांगोला, जिल्हा सोलापूर.	दि.०३.०५.२०१८ रोजीच्या आदेशात अंशत: बदल करुन श्रीम. ए.के.वाघमळे यांच्या प्रस्तावित बदलीने रिक्त होणाऱ्या पदी.
२.	श्री.एम.के.वाघ गट विकास अधिकारी, पंचायत समिती अहमदनगर, जिल्हा अहमदनगर.	उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता), जिल्हा परिषद धुळे.	दि.०३.०५.२०१८ रोजीच्या बदली आदेशात अंशत: बदल करुन.

२. संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन पदाचा पदभार त्वरीत स्वीकारावा. तसेच त्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये. त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक : सीडीआर १०८२/२५६७/२८/अकरा, दिनांक ३०.८.१९८२ च्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सूचना लक्षात घेऊन बदली रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

३. संबंधित विभागीय आयुक्त / मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बदली झालेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या नियुक्तीच्या जागी तात्काळ रुजू होण्यास सांगावे.

४. संबंधित अधिकाऱ्यांनी नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे व पदभार स्वीकारल्याचा दिनांक शासनास कळवावा. जे अधिकारी कार्यमुक्तीनंतर विहित कालावधीत बदली झालेल्या पदावर रुजू होणार नाहीत, अशा अधिकाऱ्यांविरुध्द संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विभागीय आयुक्तांमार्फत शिस्तभंग विषयक कार्यवाहीचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२३१८०९४६२०२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijay Dattatraya Shinde

Digitally signed by Vijay Dattatraya Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fabf0ce38fdf553beb949764920592a97832b6399cb7060200d032e127e455f1, cn=Vijay Dattatraya Shinde
Date: 2018.05.23 18:47:19 +05'30'

(वि.द. शिंदे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२) मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
३) मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
४) मा. सचिव (ग्राम विकास व पंचायत राज) यांचे स्वीय सहायक.
५) विभागीय आयुक्त (सर्व)
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर, सोलापूर, अहमदनगर, धुळे, नाशिक.
७) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
८) महालेखापाल - १/२ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.

९) संबंधित अधिकारी (संबंधित विभागीय आयुक्त / मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत.)
१०) कार्यासन, आस्था-२, ग्राम विकास व जलसंधारण विभाग
११) निवड नस्ती (कार्यासन, आस्था-३), ग्राम विकास व जलसंधारण विभाग.